MHKO050026202020

**नियमित दिवाणी दावा क्र.१७०/२०२० मधील**
**निशाणी १९ खालील आदेश**
**सौ. लक्ष्मी गणेश संकपाळ वि.**
**श्री. राजू बापू पाटील वगैरे १**

१. प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्रं. १ याने त्याचेविरुध्द झालेला "विना कैफियत'' आदेश रद्द होवून मिळणेसाठी व त्यांची कैफियत दावेत सामील करुन घेण्यासाठी दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादी क्रं.१ याने आपल्या अर्जामध्ये असे कथन केले आहे की, सन २०१९ पासुन देशात, राज्यात इतर सर्व ठिकाणी कोव्हीड १९ रोगाचा मोठया प्रमाणात संसर्ग झाला होता. त्यामुळे शासनाने संपूर्ण ठिकाणी लॉकडाऊनची घोषणा केलेली होती. सदरच्या लॉकडाऊनमुळे व शासनाने घातलेल्या निर्बंधामुळे प्रतिवादी नं.१ यास मुदतीत सर्व कागदपत्रे, माहिती उपलब्ध करुन मुदतीत कैफियत देता आली नाही. वादी प्रतिवादी यांचे कायदेशिर हक्क, कायेदशीर रित्या अंतिमपणे गुणदोषावर केस चालून निर्णयांकीत करण्याच्या दृष्टीने विना कैफियतीचा आदेश रद्द करुन कैफियत पटलावर घेणेची विनंती केली.

३. वादीने नि.२१ कडे अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत नोंदविली. वादीने आपल्या म्हणण्यामध्ये असे कथन केले की, सदर अर्जातील कथने वादींना मान्य व कबुल नाहीत. प्रतिवादी यांनी कैफियत देणेस किती दिवसांचा विलंब झाला व विलंबाचे कारण सुस्पष्टपणे नमुद नाही. प्रतिवादीना नेमकी कोणती कागदपत्रे व माहिती मुदतीत मिळाली नाहीत याची सुस्पष्टता नमुद नाही. त्यामुळे निव्वळ लॉकडाऊनचा गैरफायदा प्रतिवादी यांना घेता येणार नाही. तसेच त्यासंबंधीत कोणतीही कागदपत्रे मे. न्यायालयासमोर आलेली नाहीत. प्रतिवादी हे वादी यांचे कायदेशीर हक्कावर गदा आणुन वादी यांना त्रास देत आहेत व जाणुनबुजुन कैफियत

दाखल करणेस विलंब करित आहेत. त्यामुळे अर्ज खर्चासह नामंजुर करणेची विनंती केली.

४. दाव्याचे अवलोकन केले. उभय पक्षकारांतर्फे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादीविरुध्द खरेदीपत्र रद्द होवून मिळणेकरिता व विवक्षित दादी मागणीचा दाखल केलेला आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता प्रतिवादी क्रं.१ ला कैफियत दाखल करण्याची संधी देवून त्याला बचाव करण्याची संधी देणे नैसर्गिक न्यायतत्वानुसार आवश्यक आहे. तसे केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलटपक्षी, प्रतिवादी क्रं.१ चे कशानेही न भरुन येणारे नुकसान होवून त्याला आपला बचाव करण्याची संधी मिळणार नाही. परंतु प्रतिवादी क्रं.१ ने आपली कैफियत मुदतीत दाखल केलेली नसल्यामुळे प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून काही रक्कम प्रतिवादी क्रं.१ ने वादीस अदा करणेबाबत आदेश करणे न्यायोचित ठरेल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो .

२. प्रस्तुत अर्जाचा खर्च म्हणून प्रतिवादी क्रं.१ ने वादीस रक्कम रु. २००/- अदा करावी.

(येणेप्रमाणे खुल्या न्यायालयात उद्घोषित).

Digitally signed by Aishwarya Sagar Jadhav
Date: 2022.02.14 17:14:31 +0530

**(श्रीमती. ए. एस. जाधव)**
४थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर
इचलकरंजी.

दिनांक :- १४/०२/२०२२
इचलकरंजी

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Orders are same, word to word, as per the original Judgment / Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | Shri. R. D. Jadhav |
| Name of Court | Sou. A. S. Jadhav,<br>4th Jt. Civil Judge Jr. Div., Ichalkarnaji. |
| Date of Dictation | 14/02/2022 |
| Order signed by P.O. on | 14/02/2022 |
| Order uploaded on | 14/02/2022 |